नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३८ Issue - 38 | वार मंगळवार दि. २४ जून २०२५ Blow- Tuesday Date 24 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## नगरपालिका, महापालिका निवडणुकांच्या प्रभागरचना प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या प्रभागरचना ऑक्टोबर महिन्यात अंतिम होणार आहे. प्रभागरचना प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. महापालिका, नगरपालिका निवडणुका ऑक्टोबर महिन्यानंतरच होणार आहेत. महापालिका नगरपालिकांच्या प्रभाग रचना अंतिम करण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी लागणार आहे. मुंबई महापालिका प्रभाग रचना ६ ऑक्टोबरनंतर अंतिम होणार आहे. तर ड वर्ग महापालिका प्रभाग रचना १३ ऑक्टोबरला अंतिम होणार आहे.

असे असणार महत्त्वाचे टप्पे

प्रारुप प्रभाग रचना तयार करणे

यामध्ये जनगणनेची माहिती तपासणे, स्थळ पाहणी, गुगल मॅप वर प्रभागाचे नकाशे तयार करणे, प्रारूप प्रभाग रचनेचा मसुदा तयार करून त्यावर समितीने स्वाक्षऱ्या करणे. १७ जून ते ३१ जुलै दरम्यान हे काम पूर्ण केले जाणार आहे.



प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव नगरविकास विभागास सादर करणे - १ ऑगस्ट ते ५ ऑगस्ट

प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव नगर विकास विभागाने राज्य निवडणूक आयोगाला सादर करणे - ६ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट

राज्य निवडणूक आयोगाने प्रारूप प्रभाग रचनेस मान्यता देणे

प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे व त्यावर हरकती मागवणे - २२ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट

प्राप्त हरकती आणि सूचनांवर सुनावणी घेणे - २९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर

सुनावणीनंतर हरकती आणि सूचनांवर शिफारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रभाग रचना अंतिम करून नगर विकास विभागाला पाठवणे

अंतिम केलेली प्रभाग रचना नगर विकास विभागाने राज्य निवडणूक आयोगाला सादर करणे- २६ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर

राज्य निवडणूक आयोग यांनी अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देणे

राज्य निवडणूक आयुक्त यांनी अंतिम प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करणे - ३ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबर

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार टप्प्यांमध्ये होणार आहेत. ऑक्टोंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच मतदानाला सुरुवात होणार आहे. याबाबत आता निवडणूक आयोग तयारी करत आहे. राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, आदींच्या निवडणुका कधी कोरोनाच्या संसर्गाचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. ओबीसी आरक्षण द्यायचे की नाही यावरसुद्धा बराच गदारोळ झाला. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर २०२० पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती. पण, या निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत.

## मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातही धो-धो बरसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रत्नागिरी: दक्षिण कोकण-गोवा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी, उत्तर कोकण जिल्ह्यांमध्ये आणि मध्य महाराष्ट्रातील घाट भागात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी विजांसह वादळी वारे ताशी ३०-४० किमी वेगाने वाहतील आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. यामुळे कोकणातील उत्तर कोकणातील ठाणे, पालघर, उत्तर रत्नागिरी व रायगड जिल्ह्यातील प्रशासनही अलर्ट मोडवर आहे. दक्षिण कोकणात दक्षिण रत्नागिरी, सिंधुदुर्ग व गोवा प्रशासनही अलर्ट मोडवर आहे. यंदा झालेल्या मुसळधार पावसाने कोकणातील पश्चिम महाराष्ट्र जोडणारे घाट रस्तेही अडचणीत सापडले आहेत.

त्याचबरोबर केरळ, छत्तीसगडमध्येही अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, बिहार ,पश्चिम बंगाल नागालँड, अरुणाचल प्रदेश या राज्यांनाही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकण व पश्चिम महाराष्ट्र जोडणारा महत्त्वाचा मार्ग असलेल्या चिपळूण कराड मार्गावरील अवजड वाहतूक बंद करावी लागली आहे. तर, कोकण व महाबळेश्वर जोडणारा आंबेनळी घाट हा रात्रीच्या वेळेस वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. इतकंच नाही तर रायगड व पुणे जिल्हा जोडणारा वरंधा घाटातही वाहतूक बंद ठेवावी लागली आहे. एकंदरीतच लवकर आलेला अवेळी पाऊस व घाट रस्त्यांमधील सुरू असलेली काम वेळेवर योग्य पद्धतीने नियोजन करून पूर्ण न झाल्याने याचा फटका बसला आहे. यामुळे अवजड वाहतूक व अनेक प्रवासी वाहनांना पश्चिम पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, पुणे, सांगली, सातारा तसेच यामार्गे मार्गे मराठवाडा विदर्भ जाण्यासाठीही लांबच्या मार्गांचा वापर करावा लागत आहे.

तसेच महाराष्ट्रातच नव्हे तर देशात चर्चेचा विषय ठरलेला मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे गेले पंधरा वर्षे सुरू असलेल बांधकामही यामुळे चर्चेत आले आहे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या काही ठिकाणी झालेल्या बांधकामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल आहे. याच महामार्गाच्या बाजूला बांधण्यात आलेली वाकेड घाटातील काँक्रीटच्या संरक्षण भिंतीचा एक भागही चक्क खाली आल्याने कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली. कशेडी घाटातील बोगदाजवळही काही दगड खाली आल्याची घटना घडली.

## ‘वर्षा’ बंगल्यावर तातडीची बैठक, दादा भुसे अन् एकनाथ शिंदे हजर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य सरकारने १७ जून रोजी काढलेल्या शुद्धीपत्रकानंतर शालेय शिक्षणात तिसरी भाषा सक्तीची करण्यात आल्याचं दिसून येत आहे. राज्य शासनाने त्रिभाषा सुत्रीचं धोरण अवलंबल्याने राज्यभरातून या निर्णयाचा विरोध होत असून सर्वप्रथम मनसे अध्यक्ष राज ठाकरे (ठरक्ष ढहरलज्ञशीरू) यांनी पत्रकार परिषद घेऊन या निर्णयाला आमचा विरोधच राहिल, सरकारने हवं तर हे आमचं आव्हान समजावं, असा इशाराही दिला होता. त्यानंतर, मनसेकडून (चछड) हिंदी भाषेच्या पुस्तकांची होळी करत, पुस्तके फाडत आंदोलन करण्यात आले. तर, मराठी अभ्यास केंद्रानेही मुख्यमंत्र्यांना सडेतोड पत्र लिहिले आहे. एकीकडे शासनाच्या या निर्णयाला विरोध वाढत असताना दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋरवपरींळी) यांनी शिक्षणमंत्र्यांना तातडीने बोलवून बैठक घेतली आहे. विशेष म्हणजे, या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही उपस्थित आहेत.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी तातडीची बैठक बोलविण्यात आली असून त्रिभाषा सुत्रासंदर्भात आढावा बैठक असल्याची माहिती आहे. या बैठकीसाठी शिक्षण मंत्री दादा भुसे वर्षा निवासस्थानी दाखल झाले असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही उपस्थिती होती.

शाळेतील लहान मुलांवर तिसरी भाषा लादणे योग्य नाही . शिक्षण तज्ज्ञांच्या मते या वयात तिसऱ्या भाषेचा अभ्यासक्रम लादल्यास त्यांच्या सर्वांगीण विकासावर परिणाम होऊ शकतो. हिंदी सक्तीचा निर्णय रद्द होत नाही तोपर्यंत दादा भुसेला पुण्यात येऊ देणार नाही .

राज्य शासनाने १७ जून २०२५ च्या मध्यरात्री एक शुद्धिपत्रक काढून सर्वसाधारणपणे तृतीय भाषा हिंदी किंवा त्याऐवजी कोणतीही एक भारतीय भाषा घेता येईल, असा कोणीही मागणी न केलेला निर्णय घेतला. हा निर्णय म्हणजे आडमार्गाने तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्तीच आहे. आम्ही मराठीप्रेमी नागरिक व राज्यभरातले पालक एकत्रितपणे इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत आपण दिलेल्या पर्यायांसह तिसऱ्या भाषेची सक्ती ठामपणे नाकारत आहोत. तसेच शासनाच्या या अशैक्षणिक व अन्याय्य निर्णयाविरोधात ऑनलाईन नोंदणी करत आहोत. आपण त्याची दखल घेऊन तिसऱ्या भाषेची सक्ती तत्काळ रद्द करावी व तसा शासन निर्णय काढावा, अशी मागणी मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार यांनी केली आहे.

## ’विधान भवनात बसलेले षंढ’, संदीप देशपांडे यांच्या वक्तव्याने राजकारण तापलं, हक्कभंगाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांच्या वादग्रस्त वक्तव्याने महाराष्ट्रातील राजकारण तापलेलं बघायला मिळत आहे. विधीमंडळाच्या कार्यक्रमात मराठी बोर्ड नसल्याने संदीप देशपांडे यांनी टीका केली. संसदेच्या अंदाज समितीला ७५ वर्षे पूर्ण झाल्याने विधान भवनात कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात मंचावर लावण्यात आलेल्या फलकावर इंग्रजी आणि हिंदी भाषेत मजकूर होता. महाराष्ट्राच्या विधान भवनात आयोजित कार्यक्रमात मंचावर लिहिलेला आशय मराठीत नसल्यामुळे अनेकांकडून संताप व्यक्त करण्यात आला. संदीप देशपांडे यांनी तर विधान भवनात सर्व षंढ बसले आहेत, असं वक्तव्य केलं. त्यांच्या या वक्तव्याने वाद निर्माण झाला आहे.

हेच दुर्दैव आहे. सगळे षंढ लोकं तिथे बसले असतील तर मराठी माणसाने करायचं काय?, असं वक्तव्य संदीप देशपांडे यांनी केलं. त्यांच्या या वक्तव्यावर मंत्री गुलाबराव पाटील यांनी हक्कभंग आणण्याचा इशारा दिला. तसेच इतर मंत्री आणि नेत्यांनीदेखील इशारा दिला. पण तरीही संदीप देशपांडे आपल्या वक्तव्यापासून माघार घेण्यास तयार नाहीत. माझा शब्द झोंबला असेल तर त्याचा त्यांनी विचार केला पाहिजे. दुसरं म्हणजे हक्कभंगचा विषय असेल तर कारवाईला मी सामोरं जायला तयार आहे. उद्या माझ्यावर जेलमध्ये जायची वेळ आली तर मी मराठी भाषेसाठी जेलमध्ये जायला तयार आहे, असं संदीप देशपांडे म्हणाले.

विधीमंडळ हे महाराष्ट्राचं सर्वोच्च सभागृह आहे. या सभागृहात



बसणाऱ्या सभासदांना षंढ म्हणणे हे संस्कृतीला शोभून नाही. खालच्या स्तरावर जावून आम्हालाही बोलता येऊ शकतं. हा सभागृहाचा अपमान आहे. आगामी काळात बरेच आमदार त्यांच्या वक्तव्यावर हक्कभंग आणल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशारा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिला.

या संदर्भात हक्कभंग समितीकडे हक्कभंग टाकला. कारण कारण कुठल्याही विधीमंडळाच्या कामकाजांबाबत भाष्य करताना मनात कितीही एखाद्या मागणीची तीव्रता असली तरी भाषेचा उपयोग उत्तम पद्धतीने केला पाहिजे. अन्यथा आपण ज्या लोकांबद्दल अशा शब्दांचा उल्लेख करतो त्यांनाही देवाने तोंड दिलं आहे. त्यांच्याही डिक्शनरीत अशाप्रकारचे शब्द असू शकतात, असा इशारा भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिला. संदीप देशपांडे यांचं षंढ म्हणणं ठिक नाही. पण त्यांचं म्हणणं योग्य आहे. कारण महाराष्ट्रात मराठीचा कायदा झाला. न्यायालयाने मराठीचे आदेश दिले. असं असताना मंत्रालयात किंवा विधान भवनात हिंदी आणि इंग्रजी बोर्ड लावणे हे आम्हाला शोभणारे निश्चित नाही, अशी प्रतिक्रिया शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी दिली. लोकसभेने आयोजित केलेला हा कार्यक्रम आहे. राज्य सरकार कार्यक्रम आयोजित करतो तर सर्वात मोठा बोर्ड हा मराठीचा असतो, असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं.

**पोलीस उपमहानिरीक्षक सुरे मेंगडे यांना मुंबई येथे निवेदन सादर**

**पोलीस निरीक्षक अशोक पवार यांच्या निलंबनाची व चौकशीची मागणी!**

## पत्रकारांवर खोट्या गुन्ह्यांची नोंद - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आक्रमक!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (प्रतिनिधी) : लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेला वेठीस धरण्याचे सध्या प्रयत्न सुरू असून निर्भीडपणे अवैध धंद्यांविरोधात आवाज उठवणाऱ्या पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना दडपण्याचा प्रकार समोर येत आहे. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात घडलेल्या अशाच एका प्रकारामुळे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आक्रमक झाला असून, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या वतीने पोलीस उपमहानिरीक्षक मा. सुरेशजी मेंगडे यांना आज मुंबई येथे निवेदन देण्यात आले.

या निवेदनात सांगण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष श्री. किशोर रायसाकडा, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष भुवनेश दुसाने, पदाधिकारी राकेश सुतार आणि कुंदन बेलदार यांच्यावर खंडणीचा खोटा गुन्हा पाचोरा पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आला आहे. या सर्व पत्रकारांनी पाचोरा तालुक्यातील सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात सातत्याने बातम्या प्रकाशित केल्या होत्या. परिणामी, अनेक बेकायदेशीर व्यवहार बंद पडले आणि पोलिसांच्या हप्तेखोरीवरही आळा बसला.



यामुळे चिडलेल्या पाचोरा पोलीस स्टेशनचे निरीक्षक अशोक कचरू पवार आणि अवैध धंद्यांचा आका भोला उर्फ शेखर पाटील यांनी संगनमत करून खोट्या आरोपांची योजना रचली, असा गंभीर आरोप पत्रकार संघाने केला आहे. अवैध धंद्यांमुळे मोठ्या प्रमाणात मिळणारा हप्ता बंद झाल्याने बदला घेण्याच्या हेतूने या पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले, अशी भूमिका संघाने मांडली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने पुढील मागण्या निवेदनात मांडल्या आहेत:

१. हप्तेखोरीचे आरोप असलेले पोलीस निरीक्षक अशोक पवार यांना तात्काळ निलंबित करावे.

२. अशोक पवार आणि त्यांच्या कुटुंबियांनी हप्तेखोरी व अवैध मार्गाने कमावलेली संपत्ती याची सखोल चौकशी करण्यात यावी.

३. भोला उर्फ शेखर पाटील याच्यावर आधीपासून अनेक गुन्हे दाखल असून, त्याला पाचोरा तालुक्यातून हद्दपार करण्यात यावे.

४. पत्रकारांवर दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत.

५. पोलीस विभागाने अशा प्रकरणांत फक्त अर्जाच्या आधारे गुन्हे दाखल न करता, प्रथम तपास करावा आणि संबंधित पत्रकारांना विश्वासात घेऊन चौकशी करावी.

या निवेदनावर राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रचारक संजय फुलसुंदर, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दशरथ चव्हाण, मंत्रालय संपर्कप्रमुख विष्णू भुरे, प्रवीण थोरात, जेष्ठ पत्रकार भीमराव सावंत आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जर मागण्या मान्य न झाल्यास, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

पत्रकार हा समाजाचा आरसा असून, तेच खोट्या गुन्ह्यांच्या माध्यमातून झाकले जात असतील तर ही बाब अत्यंत गंभीर असून संपूर्ण पत्रकार बिरादरीने या प्रकाराचा निषेध केला आहे. यापुढे असे प्रकार टाळण्यासाठी पत्रकारांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध संघ एकवटून लढणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### पोषक वातावरण

दक्षिण कोकण-गोवा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी, उत्तर कोकण जिल्ह्यांमध्ये आणि मध्य महाराष्ट्रातील घाट भागात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी विजांसह वादळी वारे ताशी ३०-४० किमी वेगाने वाहतील आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. यामुळे कोकणातील उत्तर कोकणातील ठाणे, पालघर, उत्तर रत्नागिरी व रायगड जिल्ह्यातील प्रशासनही अलर्ट मोडवर आहे. दक्षिण कोकणात दक्षिण रत्नागिरी, सिंधुदुर्ग व गोवा प्रशासनही अलर्ट मोडवर आहे. यंदा झालेल्या मुसळधार पावसाने कोकणातील पश्चिम महाराष्ट्र जोडणारे घाट रस्तेही अडचणीत सापडले आहेत. त्याचबरोबर केरळ, छत्तीसगडमध्येही अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, बिहार ,पश्चिम बंगाल नागालँड, अरुणाचल प्रदेश या राज्यांनाही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकण व पश्चिम महाराष्ट्र जोडणारा महत्त्वाचा मार्ग असलेल्या चिपळूण कराड मार्गावरील अवजड वाहतूक बंद करावी लागली आहे. तर, कोकण व महाबळेश्वर जोडणारा आंबेनळी घाट हा रात्रीच्या वेळेस वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. इतकंच नाही तर रायगड व पुणे जिल्हा जोडणारा वरंधा घाटातही वाहतूक बंद ठेवावी लागली आहे.

# डॉ. अतुलसिंह परदेशी : दोन दशके निष्पक्ष पत्रकारितेचा भक्कम स्तंभ!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिंपरी-चिंचवड : आज २४ जून हा दिवस महाराष्ट्र पत्रकार क्षेत्रात विशेष महत्त्वाचा. कारण आज आहे आपला आवाज न्यूज नेटवर्कचे मुख्य संपादक, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे इलेक्ट्रॉनिक मिडिया प्रदेशाध्यक्ष आणि सामाजिक भान जपणारे निष्पक्ष पत्रकार डॉ. अतुलसिंह परदेशी यांचा वाढदिवस.

जिद्द, चिकाटी आणि सामाजिक जबाबदारी यांचे उत्तम मिश्रण म्हणजेच डॉ. परदेशींचा पत्रकारितेचा प्रवास. तब्बल २० वर्षे ते पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असून त्यांच्या प्रभावी आणि तळमळीच्या पत्रकारितेमुळे असंख्यांना न्याय मिळाला आहे.

**छत्रपतींच्या मातीची प्रेरणा, संघर्षांची शिदोरी:**

डॉ. अतुलसिंह परदेशी यांचे बालपण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव येथे गेले. तेथेच त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. उच्चशिक्षणानंतर त्यांनी शिवजन्मभूमी जुन्नर येथे आपल्या दुसऱ्या इनिंगला सुरुवात केली आणि त्या मातीशी इमान राखत पत्रकारितेचा वसा घेतला.

शिवाजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी समाजातील विविध समस्या निर्भीडपणे मांडल्या. त्यांच्या पत्रकारितेने अनेक प्रश्न मार्गी लावले आणि हक्काच्या लढ्यात जनतेला बळ दिले. त्यामुळे त्यांना मराठवाडा रत्न पुरस्कार, समाजरत्न पुरस्कार, पत्रकारिता भूषण पुरस्कार, महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकारिता पुरस्कार यासारख्या प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

**दोन दशकांचा तेजस्वी पत्रकारितेचा प्रवास:**

२००४ साली त्यांनी दैनिक गावकरीमधून पत्रकारितेला सुरुवात केली. त्यानंतर पुढारी, प्रभात, लोकमत, पुण्यनगरी यांसारख्या अग्रगण्य दैनिकांतून त्यांनी प्रिंट मिडियात ठसा उमटवला. हे करत असतानाच ते जीवनातही संघर्ष करत राहिले. वडापाव विक्रीपासून पेट्रोल विक्रीपर्यंत विविध व्यवसाय त्यांनी अनुभवले.

या संघर्षातून त्यांनी २०१४ साली 'आपला आवाज' न्यूज नेटवर्क या ग्रामीण चॅनलची स्थापना केली. किल्ले शिवनेरी या पवित्र भूमीतून सुरू झालेला हा प्रवास नंतर पिंपरी-चिंचवड या औद्योगिक नगरीत पोहोचला. आपला आवाज न्यूज हे चॅनल आज संपूर्ण पुणे जिल्ह्यातील सकारात्मक बातम्यांचे प्रभावी व्यासपीठ झाले आहे.

**उद्योजकतेकडे वाटचाल आणि सामाजिक बांधिलकी:**

पत्रकारितेबरोबरच त्यांनी स्थावर मालमत्ता व बांधकाम व्यवसायात पाऊल टाकले. जुन्नर या पर्यटन तालुक्यात त्यांनी हेलिकॉप्टर राईड सुरु करून स्थानिक पर्यटनाला चालना दिली.

याचबरोबर त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम हाती घेतले. गरजू पत्रकारांना आर्थिक मदत, सामाजिक संस्थांना मदतकार्य, आणि नवनिर्माणात सक्रिय सहभाग हे त्यांचे वैशिष्ट्य ठरले आहे.

रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरी चे २०२२-२३ चे अध्यक्ष म्हणून त्यांनी प्रभावी नेतृत्व दिले.

**प्रेरणादायी आदर्श व्यक्तिमत्त्व:**

डॉ. परदेशी हे केवळ पत्रकार नाहीत, ते एक दृष्टीकोन, एक प्रेरणा आहेत. त्यांनी नव्या पिढीसमोर एक आदर्श उभा केला आहे की, पत्रकारिता ही केवळ बातमी लिहिणे नाही, तर समाज घडवण्याचे माध्यम आहे.

त्यांची पत्रकारिता ही सडेतोड, निर्भीड आणि निष्पक्ष आहे. त्यामुळे त्यांची कामगिरी ही आजच्या धोकादायक आणि द्वेषमूलक वातावरणात फार मोठी प्रेरणा ठरते.

डॉ. अतुलसिंह परदेशी यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा. त्यांनी जो निष्पक्ष पत्रकारितेचा वसा घेतला आहे, तो असाच फुलत राहो, बहरत राहो.

छत्रपती शिवरायांच्या चरणी आणि किल्ले शिवनेरीवरील शिवाई देवीच्या कृपेने त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अजून मोठ्या सामाजिक लढ्यांत यश मिळो हीच प्रार्थना!

**शब्दांकन: डॉ. विश्वासराव आरोटे,**
राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई, संपादक दैनिक समर्थ गांवक

# आयुष्यमान वामन धाडवे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आयुष्यमान वामन धाडवे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. आयु. वामन धाडवे हे मूळचे मौजे वागदरी, तालुका तुळजापूर, जिल्हा धाराशिव येथील रहिवासी. परंतु जीवनकाळ व्यतीत करण्यासाठी पुण्यात स्थायिक झाले. रिक्षा व्यवसाय. फुले आंबेडकर शाहू विचारांची ओढ. त्या विचाराने भारावलेले असल्याने सामाजिक आणि सांस्कृतिक कार्याची ओळख आपण इतरांसाठी काहीतरी केले पाहिजे या विचाराने समाजकार्यात हिरीरीने सक्रिय असतात. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ वाचून अथवा जयंती करून उपयोग नाही तर त्यांचे विचार आचरणात आणायला हवेत. किंबहुना आंबेडकरांच्या विचारांच्या प्रकाशात आपल्या जगण्याची दैनंदिन तपासणी करण्याची गरज आहे. माणसाला माणूस म्हणून सन्मानाने, स्वतंत्रपणे, समानतेने जगता यायला हवे. यासाठी विविध उपक्रमात जोमाने भाग घेतात. फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांच्या सुरू केलेल्या व वंचित पद्धतीत वर्गाच्या लोकांचे हक्क अधिकार समानता व सुधारणा यावर भर देणारी चळवळ चळवळीत आग्रही असतात. सत्य शोधून काढून न्याय मिळाला पाहिजे या भूमिकेत नेहमी वावरत असतात. पक्ष कोणता का असेना परंतु सामान्य माणसाला न्याय मिळाला पाहिजे. निवारा मिळाला पाहिजे. अन्न, पाणी, वस्त्र आरोग्य, शिक्षण, त्याचा नैसर्गिक अधिकार आहे. तो अधिकार अबाधित राहावा म्हणून ते कार्यरत आहेत. जनतेचे शोषण होता कामा नये. शोषणाविरुद्ध संघर्षाच्या भूमिकेत आंबेडकरी कार्यकर्ता म्हणून त्यांचा वापरण्याजोगी आहे.

खरे, वामन धाडवे हे सामान्य कार्यकर्ते असले तरी त्यांची चीड ही सामाजिक आहे. वैचारिक तत्वावर आधारित आहे. आम्ही आंबेडकरी फुले प्रणित विचार तत्त्वावर शिवाय लढू शकत नाही. यासाठी तत्त्वज्ञान आवश्यक आहे. विचारांचे पाठबळ नियम व तत्वांचे पाठबळ वैज्ञानिक व वैचारिक दृष्टिकोन न्यायाच्या आधारे असणारा दृष्टिकोन सर्वसामान्य ना प्रगतिशील करावा लागणार आहे. माणसात नैसर्गिक ऊर्जा असते. त्याला केवळ वैचारिक व सैद्धांतिक बैठक हवी असते. आम्ही तत्त्वज्ञानाचा तत्त्वज्ञानावर आधारित इतिहास रचणारे आहोत प्रयत्न आवश्यक आहेत.

काळ बदलतो. परिस्थिती बदलते. जगण्याचे संदर्भ बदलतात. आव्हाने व संधीही बदलतात.

याप्रमाणे परिस्थितीचा अंदाज घेत वामन धाडवे वाटचाल करत आहेत. ब-याचवेळा काळ बदलण्यासाठी समोरच्याला समजून घ्यावं लागतं, उमजून घ्यावं लागतं, परखावं लागतं. शत्रु कोण, मित्र कोण ओळखाव लागतं. सातत्याने बाबासाहेब वाचावे लागतात. छत्रपती शाहू राजे वाचायला लागतात. महर्षी विठ्ठल शिंदे समजून घ्यावे लागतात. गोपाळबाबा वल्लंकर यांना वाचावे लागतं. पेरियार वाचावे लागतात. महात्मा फुले वाचायला.

ज्यांनी समग्र समाजाच्या परिवर्तनासाठी आयुष्य कसं वेचले हे समजून घ्यावे लागत. आपल्या क्रांतिकारी विचारांनी माणूस त्यांनी कसा जागवला आणि सर्व प्रकारच्या शोषणाला आणि दास्याला त्यांनी कसा नकार दिला व विद्रोह केला हे समजून घ्यावं लागतं. तेव्हा कार्यकर्ता घडत असतो. कार्यकर्ता बनण्याची ही प्रक्रिया असते. विचार, सिद्धांत व प्रमेयाची मांडणी नीटपणे वाचावी लागते. तात्विक आणि वैचारिक बैठक निर्माण व्हावी लागते. जिथे जिथे फुले आंबेडकर चळवळ आहे तिथे जाऊन तो असे घ्यावा लागतो. समाज प्रबोधन घडवून आणाव लागतं. आपलं मन आणि हृदय पूर्णपणे आंबेडकरमय व फुलेमय व्हायला हवा. आपण शंभर टक्के आंबेडकरवाद स्वीकारावा लागतो. परंपरागत आणि पुनर्जीवनवादी शक्तीला उधळून लावण्याची शक्ती निर्माण व्हावी लागते. यासाठी प्रबोधनवादी साहित्य वाचावं लागतं. पुस्तके वाचावे लागतात. विचार उलगडावे लागतात. चळवळप्रणित साहित्याची पाने उलगडावी लागतात. संमेलनातून विचार समजून आपल्याला घ्यायला हवं. दोन संस्कृती मधला संघर्ष नीटपणे समजून घ्यावा लागतो. वैदिक- अवैदिक, आंबेडकरवादी आणि हिंदूत्ववादी, संविधानवादी व आरक्षण विरोधी, ....

कारण पुनरूज्जीवनवादी संस्कृतीला बुद्धीप्रामाण्यवाद नको असतो, समता नको असते, बंधुता नको असते, सामाजिक न्याय नको असतो, समाजाची सर्व संपत्ती, शिक्षण, ज्ञान, अधिकार आपल्या मालकीची असावी असं वाटतं. आपले स्वामित्व बाधित राहावे यासाठी तिची महत्त्वकांक्षा असते. यासाठी नीटपणे ईश्वरवाद, परलोकवाद, बुद्धीप्रामाण्यवाद, धर्मांधता ही तिची माध्यम आहेत. वर्णवादाची बळकटी हा तिचा आधी आणि अंतिम एक कलमी असा कार्यक्रम आहे. यासाठी श्रमण संस्कृत नीट समजून घ्यावं लागतं. परिणामी, परिवर्तनवादी साहित्यही उभे करावे लागते. हे कार्यकर्त्याला नीटपणे कळले पाहिजे.

बाबासाहेब आंबेडकरांमुळे लेखन्या सरसावल्या, माणसे उभी राहिली, समाज निर्माण झाला, स्वाभिमान जागवला, जागृत झाला, प्रत्येक जण आत्मनिर्भर झाला, प्रज्ञा सूर्याची आस निर्माण झाली. तो बोलू लागला. तो सरसावू लागला. तो चालू लागला. बहुजनांचा आवाज बनला.

यामुळे एक झालं की तो जातिवाद मानत नाही. धर्मविचार मानत नाही. धर्म साहित्य मानत नाही. तो झुगारून देतो आणि त्याचवेळी एक नवा माणूस, नवी समाज रचना, कशी घडवता येईल नवा विचार साहित्यातून कसा देता येईल या दृष्टीने या साहित्यातील प्रबोधन करण्याचाही प्रबोध प्रयत्न करतो. समताधिष्ठित समाज रचना निर्माण करण्यासाठी तो प्रयत्नशील असतो..... यासाठी नीटपणे आंबेडकर कळायला हवेत. यासाठी आंबेडकर चळवळीतला कार्यकर्ता हा एकेकाळी लेखक कवी व साहित्यिक होते हे आपल्याला दिसत येणार नाही. कालकथित राजा ढाले; नामदेव ढसाळ, ज.वी. पवार; अर्जुन डांगळे, अविनाश माहतेकर, इत्यादी...



या सामाजिक कार्यकर्त्यांना आधी सामाजिक व साहित्यिक भान निर्माण झाले. हे सत्य आहे. त्यांनी समाजाविषयी मानवी जीवनाविषयी आणि माणुसकीशी आस्था, सखोल अभ्यास व लेखन केलं. अवतीभोवतीच्या परिस्थितीवर, स्त्री शोषणावर, विषमतेवर, जातीयतेवर, मानवीय अप्रतिष्ठेवर, आत्मप्रक्षेपणार्थ असलेले जीवन त्याने रेखाटलं. व्यक्त होत होते. समाज परिवर्तनाचा वसा घेतला ध्यास घेतला नव्या मूल्याच्या शोधात लेखन केलं आणि एक समाज व्यवस्था उभी राहावी यासाठी आपलं साहित्य समर्पित केले. तेव्हाच ते सामाजिक कार्यकर्ता म्हणून पुढे आले.

वामन धाडवे यांना पुनश्च शुभेच्छा....!

**– डॉ. डी टी गायकवाड,**
माजी ग्रंथालय व माहिती अधिकारी;
केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र;
खडकवासला, पुणे

# स्वेरी संस्थेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड

## नूतन अध्यक्षपदी अशोक भोसले, उपाध्यक्षपदी सुरेश राऊत यांची तर सचिवपदी प्रा. सुरज रोंगे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्यातील तंत्रशिक्षण क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून विशेष शैक्षणिक योगदान देत असलेल्या गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील 'स्वेरी' तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन न्ड रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेच्या नूतन अध्यक्षपदी अशोक भोसले यांची, उपाध्यक्षपदी सुरेश राऊत यांची तर सचिव पदी प्रा. सुरज रोंगे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

गोपाळपूरच्या ओसाड माळरानावर सन १९९८ साली 'स्वेरी' तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेअंतर्गत पदवी अभियांत्रिकी (डिग्री इंजिनिअरिंग), पदविका अभियांत्रिकी (डिप्लोमा इंजिनिअरिंग), पदवी औषधनिर्माण शास्त्र (बी.फार्मसी), पदविका औषधनिर्माण शास्त्र (डी.फार्मसी) तसेच एम.बी.ए., एम.सी.ए., एम.टेक. व पीएच.डी. पर्यंतची महाविद्यालये सुरळीतपणे सुरु आहेत. स्वेरीचे संस्थापक व स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, बाळे, सोलापूरचे विद्यमान अध्यक्ष डॉ.बी.पी.रोंगे यांच्या नेतृत्वाखाली व १४ विश्वस्तांच्या सहकार्याने स्वेरीने शिक्षणक्षेत्रात विविध उपक्रम राबवत विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासात सातत्याने 'पंढरपूर पॅटर्न'च्या माध्यमातून नवीन प्रयोग करत असताना यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत केली आणि अजूनही ही घोडदौड सुरूच आहे आणि याच यशस्वी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव या पदांची निवड आज करण्यात आली.







या प्रसंगी मावळते अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांच्या हस्ते नूतन अध्यक्ष अशोक भोसले यांचा, माजी अध्यक्ष व विश्वस्त सी.बी. नाडगौडा यांच्या हस्ते उपाध्यक्ष सुरेश राऊत यांचा आणि माजी उपाध्यक्ष व विश्वस्त रामराव रिसवडकर यांच्या हस्ते नूतन सचिव प्रा. सुरज रोंगे यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर आपले मनोगत व्यक्त करताना नूतन अध्यक्ष अशोक भोसले म्हणाले कि, 'स्वेरी या संस्थेच्या अध्यक्षपदी माझी एकमताने निवड केल्याबद्दल मी सर्वप्रथम संस्थेचे सर्व सदस्य, पदाधिकारी व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानतो. ही निवड केवळ माझ्यासाठी सन्मानाची बाब नाही, तर हे एक मोठे कर्तव्य आणि जबाबदारी आहे, याची मला जाणीव आहे. शिक्षण, मूल्य, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी या चार आधार स्तंभांवर उभा असलेला हा संस्थेचा प्रपंच अधिक भक्कम करण्यासाठी मी अध्यक्ष म्हणून अजून जास्त काम करणार आहे.' आपले मनोगत व्यक्त करताना उपाध्यक्ष सुरेश राऊत म्हणाले कि, 'स्वेरी संस्था ही ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा प्रकाशस्तंभ आहे. स्वेरीचा नावलौकिक अबाधित ठेवून संस्थेच्या अधिक प्रगतीसाठी एकजुटीने काम करणार आहोत.' संस्थेचे नूतन सचिव प्रा.सुरज रोंगे म्हणाले कि, 'संस्थेच्या सचिवपदी निवड केल्याबद्दल सर्वप्रथम मी सर्व विश्वस्त, पदाधिकारी व संस्थेच्या सर्व घटकांबद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त करतो. 'स्वेरी' ही एका उदात्त स्वप्नातून आणि शून्यातून निर्माण झालेली संस्था आहे. स्थापनेपासून स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी व सर्व विश्वस्तांनी अहोरात्र कष्ट घेऊन संस्थेच्या नाव लौकिकासाठी अपार कष्ट केले. तीच प्रेरणा डोळ्यासमोर ठेवून संस्थेच्या भविष्यातील भरभराटीसाठी अथक प्रयत्न करणार आहे.'

स्वेरीचे मावळते सचिव आणि स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, बाळे, सोलापूरचे विद्यमान अध्यक्ष डॉ. बी. पी. रोंगे यांचा स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त सी.बी.नाडगौडा यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना डॉ. बी. पी. रोंगे म्हणाले कि, 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या ध्येयाने १९९३ साली सुरुवातीला आम्ही हे स्वप्न पाहिले आणि १९९८ मध्ये ही संस्था उभी केली. संस्थेची सुरुवात ही अत्यंत अल्प साधनांमध्ये, पण मोठ्या स्वप्नांसह झाली. अनेक अडचणी, आव्हाने आणि अडथळ्यांचा सामना करत करत आम्ही संस्थेचा पाया मजबूत केला आणि आज ही संस्था एका विशिष्ट उंचीपर्यंत पोहचली आहे. शेवटच्या श्वासापर्यंत या संस्थेच्या प्रगती साठी प्रयत्नशील राहणार आहे.'

या नवीन पदाधिकारी निवडीच्या निमित्ताने संस्थेचे सर्व विश्वस्त, स्वेरी अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, कॅम्पस इनचार्ज, उपप्राचार्या, सर्व अधिष्ठाता व सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.




# निसर्ग मैत्री ग्रुप कल्याण यांच्यातर्फे ५१ झाडांचे आंबिवली जैव विविधता उद्यान, आंबिवली येथे वृक्षारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कल्याण/बाळासाहेब अहिरे : कल्याण यांचे वतीने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून कल्याण डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत असलेल्या आंबिवली जैव विविधता उद्यान, आंबिवली पूर्व येथे (५१) झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

सदर वुक्षरोपन कार्यक्रमात मा.कल्याण जिल्हा व सत्र न्यायालय, कल्याण पश्चिम येथील ॲड.शलाका अहिरे, ॲड मीनल इनामदार, ॲड. प्रकाश रासकर, ॲड सुनीता देवरे, ॲड. रंजना म्हात्रे, ॲड. दीपश्री वंटमोरे,ॲड. अनिकेत गुंजाळ, ॲड. निलावती होलमुखे, ॲड.संगीता गोडसे, ॲड.माधुरी जोशी, एड. तबस्सुम बैरागदार तसेच इतर मान्यवरांनी सक्रिय सहभाग मोठ्या प्रमाणात नोंदवण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी यात्राः यात्रेच्या अनुषंगाने भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची पूर्व तयारी अंतिम टप्प्यात : गहिनीनाथ महाराज औसेकर

## मंदिर समितीच्या जमिनी ३३ महिन्यासाठी वहिवाटीस देणेकामी शासनास प्रस्ताव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा सोहळा दिनांक ०६ जुलै रोजी असून, यात्रा कालावधी २६ जून ते १० जुलै असा आहे या कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. या यात्रेच्या अनुषंगाने भाविकांना मंदिर समिती मार्फत देण्यात येणा-या सोई सुविधांची पूर्व तयारी अंतिम टप्प्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

आषाढी यात्रेच्या अनुषंगाने मंदिर समितीची बैठक सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे संपन्न झाली. सदर बैठकीस मंदिर समितीचे सदस्य शकुंतलाताई नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ड. माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

आषाढी यात्रा कालावधीत मंदिर समितीने भाविकांच्या सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य दिले आहे, त्या अनुषंगाने करण्यात आलेली पूर्व तयारी अंतिम टप्प्यात आहे. यात्रेला येणा-या भाविकांना चांगल्या व पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचा आढावा घेण्यात आला. तसेच मंदिर समितीच्या जमिनी संपूर्ण महाराष्ट्रभर विखुरलेल्या आहेत. सदरच्या जमिनी वहिवाटीस देणेकामी प्रतिसाद कमी मिळत असल्याने, ११ महिने ऐवजी ३३ महिन्यांसाठी भाडे तत्वावर देणेकामी शासनास प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. याशिवाय, सदर जमिनी वहिवाटीस प्रतिसाद मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना राबविण्यात येणार आ-हेत, याबाबतचे निर्णय बैठकीत घेण्यात आले असल्याची माहिती सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

आषाढी वारींच्या अनुषंगाने पदस्पदर्शनरांगेत अत्याधुनिक पध्द-तीची १२ पत्राशेड उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. या दर्शनरांगेत श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप पासून कासार घाट पर्यंत २२० मीटर लांबीचा स्कायवॉक, स्कायवॉक ते पत्राशेड पर्यंत वासे व बांबुचे बॅरीकेटींग करून, वॉटरप्रुट मंडप उभारणे, पत्राशेड पासून गोपाळपूर येथील स्वेरी कॉलेजपर्यंत बॅरीकेटींग, दर्शनरांगेत बसण्यासाठी बाकडे, रहदारीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून ६ ठिकाणी उड्डाणपुले, ३ ठिकाणी विश्रांती कक्ष, यंदा प्रथमच दर्शनरांगेत पाणी वाटपाच्या स्टॉलसोबत फिरते गाडे ठेवण्यात आले आहेत. तसेच मुखदर्शनरांगेत छत्रपती संभाजी चौक येथे सरकता उड्डाणपुल बसविण्यात येणार आहे. याशिवाय, स्वयंसेवी संस्था, उपजिल्हा रूग्णालय व तालुका वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत वैद्यकीय सुविधा देण्यात येणार आहे, यात्रेच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व पूर्व तयारी झाली असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.





# कोठुरे सावरकर विद्यालयात योग दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते म्हणाले की . जागतिक स्तरावर योगाला पोहोचवण्यात भारताचे महत्त्वपूर्ण योगदान असून योगाच्या माध्यमातून शारीरिक मानसिक स्वास्थ्यासाठी योगा हे आधुनिक जगातील महत्त्वपूर्ण साधन बनले आहे .योगाचे महत्त्व जगात सर्वदूर पोहोचले असून आपल्यामध्येही योगा बद्दल जागृती असली पाहिजे. म्हणूनच विद्यार्थ्यांनी दररोज किमान पंधरा मिनिटे योगा करावा असे आवाहन आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी केले. यावेळी योग शिक्षक नवनाथ शिंदे, किर्ती सारडा व पालक समिती सदस्य प्रताप मोगल यांनी सुक्ष्म हालचाली ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन ,भद्रासन ,अर्ध उष्ट्रासन, शंकासन, वज्रासन भुजंगासन ,शालव-ासन ,मकरासन ,कपालभाती, अनुलोम-विलोम भ्रमरी ध्यान योग आदि. विषयी सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांकडून करून घेतले .यावेळी अनेक शिक्षकांनी योगा प्रात्यक्षिकात सहभाग घेतला.यानंतर विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक संजय निकम यांनी २१ जून हा वर्षातील सर्वात मोठा दिवस याचे महत्त्व विद्यार्थ्यांना विशद केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडा शिक्षक लहानु शिंदे यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण भडांगे यांनी केले. तर आभार सुधाकर निकम यांनी मानले .

# महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पंढरपूर दौऱ्यावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रेनिमित्त विठ्ठलाच्या दर्शनाला १५ ते २० लाख भाविक येणार आहेत. प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. आषाढी यात्रेचे तयारीची पाहणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिनांक २५ रोजी बुधवारी येणार असल्याची समजते.



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असताना त्यांनी आषाढी यात्रेच्या अगोदर पाहणी करण्यासाठी आले होते. तिने अनेक ठिकाणची पाहणी केली होती व निकृष्ट दर्जाची कामे झाले होते. तसेच त्यांनी दर्शन मंडपात मध्ये जाऊन भाविकांची पाहणी केली व त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी मंदिर समितीला तशा अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या होत्या. आषाढी यात्रेमध्ये १५ लाखाहून अधिक भाविक दाखल होतील . महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाविकांना सुविधा द्याव्यात अशा सूचना दिल्या आहेत. यासाठी कोट्यावधी रुपये चा निधी देण्यात आला आहे. यातून विविध कामे करण्यात येत आहेत या कामाची पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिनांक २५ बुधवार रोजी येणार आहेत व विविध कामाची पाहणी करणार आहेत.

# लोकराजे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : साकेगांव येथे दि. २६/६/२०२५ रोज गुरुवार लोकराजे आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ जयंती निमित्त शासनाच्या रीतसर परवानगीने उभारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती साकेगांव यांनी आरोग्य उपकेंद्र साकेगाव येथे दि. २६/६/२५ रोजी ९ते ११पर्यत स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर धनंजय प्रतापसिंग परिहार यांची मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजन करण्यात आले आहे तरी यामध्ये महिलांच्या प्रसूतीपूर्व व पश्चात उपचार स्त्रीरोग चिकित्सा व उपचार नॉर्मल डिलिव्हरी सिझेरियन डिलिव्हरी वारंवार होणारे गर्भपात यावर निदान व उपचार कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया मासिक पाळीच्या समस्या निदान व उपचार लॅप्रोस्कोपी ऑपरेशन दुर्बीण द्वारे बिन टाकीचे ऑपरेशन वंधत्व निदान व उपचार कर्करोग निदान व उपचार या सर्व आजारांवर निदान व उपचार यासाठी पंचक्रोशीतील माता भगीनींनी जास्तीत जास्त या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हाहन ग्रामपंचायत सदस्य जितु निकाळजे यांनी केले आहे.



# योगा ही मानवी जीवनाला लाभलेली अमूल्य देणगी : मिलिंद देशपांडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दत्तवाड/प्रतिनिधी : मानवी शरीर व मन यांचे संतुलन राखणे महत्वाचे आहे. चुकीच्या जीवनशैलीमुळे धकाधकीच्या जीवनात अनेक प्रकारच्या अनेक व्याधी आजार जडतात आणि जीवनात उत्साह संपून नैराश्याच्या गर्तेत ढकलले जाते. यातून बाहेर पडणे कठीण होते. म्हणून योगा महत्वाचे आहे.म्हणून योगा ही मानवी जीवनाला लाभलेली अमूल्य देणगी असल्याचे प्रतिपादन पत्रकार व योग अभ्यासक मिलिंद देशपांडे यांनी केले. ते विद्या मंदिर

### बांबरवाडीत योग दिन उत्साहात

बांबरवाडी, दत्तवाड येथील जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमात प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करताना बोलत होते.

शालेय विद्यार्थ्यांसह भाजपा किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष राजगोंडा पाटील, भाजपा तालुका उपाध्यक्ष तेजस वराळे, पत्रकार मुन्नाभाई नदाफ, सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोक कोकणे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ.कविता सचिन पाटील, माजी उपसरपंच दिलीप चव्हाण, सचिन पाटील, रघुनाथ चव्हाण, स्मिता धोंड, उषा पोवार, मुख्याध्यापक दिलीप शिरढोणे, अध्यापक निलेश माने उपस्थित होते.

### ह.भ.प शिवानंदगिरी महाराज शास्री यांचे हस्ते भक्तिमय वातावरणात पार पडला सोहळा

# नैताळेत स्व. भास्कर बोरगुडे व स्व. विठ्ठल बोरगुडे यांच्या स्मरणार्थ वैकुंठरथाचे लोकार्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नैताळे येथील स्वर्गीय भास्कर बोरगुडे व स्वर्गीय विठ्ठल बोरगुडे यांच्या पवित्र स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे वंशज शिवाजी बोरगुडे यांनी दोन लाख रुपये खर्च करुन साकारण्यात आलेल्या वैकुंठरथाचे लोकार्पन सोहळा मोठ्या श्रद्धा, भक्ती आणि उत्साहात ह.भ.प शिवानंदगिरी महाराज शास्त्री यांचे हस्ते पार पडला. हा सोहळा आज दुपारी नैताळे येथील राम आनंद लॉन्स येथे संपन्न झाला.

स्वर्गीय विठ्ठल बोरगुडे एक सुसंस्कृत व्यक्तिमत्व होते भाऊंच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ एक अनोखा समाज उपयोगी उपक्रम राबवीला आहे नैताळे गावचा परीसर खूप विस्तारला आहे. लोकं शेतावर राहायला गेली आहे. परिसरात वस्त्या वाढल्या आहेत. नविन स्मशानभुमी गावापासुन दूर झाल्याने अशा वेळी घर ते स्मशानभूमी अंतर खूप वाढलंय शिवाय गाव ते स्मशानभुमी हे अंतर वाढले आहे. काळाची गरज ओळखून बोरगुडे परीवाराने वैकुंठ रथ लोकांच्या सेवेसाठी अर्पण केला उपक्रम कौतुकास्पद असल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. वैकुठरथ लोकार्पन सोहळा



ह.भ.प शिवानंदगिरी महाराज शास्त्री, माजी सरपंच संजय बोरगुडे, शिवाजी बोरगुडे, जगन पाठक, ग्रामविकास अधिकारी उज्वला भोईर, नवनाथ बोरगुडे, अरुण घायाळ यांच्या हस्ते पार पडला.

या प्रसंगी ज्ञानेश्वर घायाळ, रतन बोरगुडे, भरत बोरगुडे, लक्ष्मण बोरगुडे, रविंद्र बोरगुडे, महेश बोरगुडे, बापूसाहेब बोरगुडे, किरण बोरगुडे, भिमराव बोरगुडे, नामदेव बोरगुडे, एकनाथ बोरगुडे, सुभाष बोरगुडे, सनी बोरगुडे, नितीन बोरगुडे, आनंदा डावखर, तानाजी डावखर, योगेश बोरगुडे, सोमनाथ बोरगुडे, रामदास बोरगुडे यांच्यासह बोरगुडे परिवार व असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

**माझे आजोबा स्वर्गीय भास्कर बोरगुडे व वडील स्वर्गीय विठ्ठल बोरगुडे यांच्या पुण्यस्मरणार्थ दोन लाख रुपये खर्च करुन नैताळे गावासाठी वैकुंठरथ तयार केला आहे.आज त्याचा लोकार्पन सोहळा उत्सहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाला आज पासुन वैकुंठरथ नैताळे ग्रामपंचायतीच्या व्यावस्थापनाच्या ताब्यात देत असुन यापुढे त्यावर ग्रामपंचायतच नियंत्रण ठेवेल.**

**– शिवाजी बोरगुडे**
**नैताळे ता.निफाड**

# चिंचवली येथील शेतकऱ्यांची खैराची झाडे चोरीला : चौकशी करुन चोरट्यांवर कडक कारवाईची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या दुर्गम भागातील चिंचवली येथील एका शेतकऱ्याच्या माळरानावरील खैराची झाडे चोरीला गेल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्यात घबराट पसरली आहे.



चिंचवली येथील शेतकरी गुरूनाथ गायकर यांनी त्यांच्या मालकीच्या ९७/७ या सर्वे नंबरच्या माळरानावरील जमीनीत खैराच्या झांडाची मोठी लागवड केली होती. त्यातील कात तयार करण्यासाठी खैराच्या झाडातील जो गर तयार व्हायला लागतो तो गर तयार झालेली ३० ते ४० वर्षापूर्वीची ८० फुट लांबी २ फुट जाडी असलेली २० खैराची मोठी झाडे अज्ञात चोरट्यांनी बुधवारी मध्यरात्री झाडे कापण्याच्या मशीनच्या सहाय्याने कापुन चोरी केल्याची घटना भिवंडी तालुक्यातील चिंचवली येथे घडली आहे. त्यामुळे गरीब शेतकऱ्याचे सुमारे साडेसात लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. त्याच दिवशी सकाळी चोरीची ही घटना शेतकरी गुरूनाथ गायकर यांच्या लक्षात येताच त्यांनी वनमंत्री महाराष्ट्र राज्य, उपविभागीय अधिकारी(प्रांत)तहसीलदार भिवंडी, विभागीय पोलीस उपअधीक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी पडघा,परिमंडळ वनअधिकारी वडपा, वरीष्ठ पोलीस निरीक्षक भिवंडी तालुका यांना निवेदन देऊन सदर प्रकरणाची चौकशी करून चोरी करणाऱ्यावर कडक कायदेशीर कारवाई करुन मला न्याय द्यावा अशी मागणी केली आहे.

# शेगाव दुमाला चौक ते जुना दगडी पूल या ठिकाणी दुकाने उभारण्यास मनाई

## उपविभागीय दंडाधिकारी इथापे यांनी आदेश केले जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रेच्या अनुषंगाने शेगाव दुमाला चौक ते तीन रस्ता, जुना दगडी पूल या ठिकाणी दुकाने उभाण्यास, हातविक्री करण्यास तसेच हॉटेल्स, स्टॉल्स लावण्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये प्रतिबंध करण्यात आला असून, याबाबतचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी जारी केले आहेत.

आषाढी एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी होणार असून, यात्रा कालावधी २६ जून ते २६ जुलै २०२५ असा आहे. या सोहळ्याच्या कालावधीत लाखो भाविक श्री. विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी व चंद्रभागा स्नानासाठी पंढरपूरला येतात. आषाढी एकादशीला येणारे भाविक चंद्रभागा नदीपात्राल-गतच असणा-या शेगाव दुमाला येथील भक्तीसागर (६५एकर) येथे वास्तव्यास असतात. त्यामुळे शेगाव दुमाला चौक ते तीन रस्ता या परिसरात भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी असते. आषाढी यात्रेसाठी येणारे भाविक भक्तीसागर (६५ एकर) परिसरात वास्तव्यास असल्यामुळे सदरच्या ठिकाणी मोठया प्रमाणात दुकाने, हातविक्रेते, तात्पुरती हॉटेल्स, स्टॉल्स लागतात. चंद्रभागा नदीपात्रातील दगडी पूल ते तीन रस्त्यावर भाविकांची, वाहनांची मोठया प्रमाणात गर्दी होवून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेगाव दुमाला ते तीन रस्ता या परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी होवून चेंगराचेंगरीसारखी घडू नये, यासाठी शेगाव दुमाला रस्ता ते तीन रस्ता, जुना दगडी पूल या ठिकाणी दुकाने उभारण्यास, हातविक्री करण्यास तसेच हॉटेल्स, स्टॉल्स लावण्यास मनाई करण्यात आली आहे

सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्ती कायदेशीर कारवाईस पात्र राहील असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. आषाढी यात्रा सोहळा कालावधीत लाखो भाविक श्री. विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला येतात. यावेळी दर्शनासाठी अनेक तास भाविक दर्शनरांगत उभे असतात. भाविकांना दर्शन सुकररित्या होण्यासाठी दर्शनरांगेचे व्यवस्थापन आवश्यक असून, दर्शनरांगेत घुसखोरी होत असल्याचे प्रसंग प्रसारमाध्यमातून व भाविकांच्या तक्रारीतून निदर्शनास येत आहे. या घुसखोरीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### दर्शनरांगेत घुसखोरी करण्यास प्रतिबंध: आदेश जारी

**आषाढी एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी होणार असून, यात्रा कालावधी २६ जून ते २६ जुलै २०२५ असा आहे. या कालावधीत लाखो भाविक श्री. विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला येतात. दर्शन रांगेत घुसखोरीमुळे अनुचित प्रकार घडून चेंगराचेंगरी अथवा अन्य कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे १६३ (२) कलम अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.**

# मान्सून राजधानीच्या उंबरठ्यावर! दोन दिवस वादळी पावसाचा अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: उत्तर भार-तातील डोंगराळ राज्यांतही प्रवेश केलेला मान्सून आता राजधानी दिल्लीच्या उंबरठ्यावर असून आज, मंगळवारी किंवा बुधवारी दिल्लीत वादळी पाऊस होईल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. पाऊसधारा बरसल्या, तर गेले चार महिने असह्य उन्हाळा व दमट वातावरणाने त्रासलेल्या दिल्लीकरांना दिलासा मिळणार आहे.

मान्सूनने आता संपूर्ण लडाख व्यापले आहे. हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीरचा बहुतांश भाग आणि पंजाबच्या काही भागातही तो पोहोचला आहे. दिल्लीसह राजस्थान, पंजाब, हरियाणा, चंडीगडच्या अनेक भागांमध्ये, तसेच पश्चिम उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश व जम्मू-काश्मीरच्या उर्वरित भागातील हवामान स्थिती मान्सूनच्या आगमनासाठी योग्य बनली आहे. हवामान खात्याकडून दिल्ली, गुडगाव, फरिदाबादसाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

आयएमडीच्या अंदाजानुसार, दिल्लीत मंगळवारी मान्सूनचे आगमन झाले, तर सन२०१३ नंतर प्रथमच जूनअखेरच्या आठवड्याआधी दिल्लीत मान्सूनधारा बरसतील.

सन २०१३मध्ये दिल्लीत पहिला पाऊस १६ जून रोजी बरसला होता. गेल्या वर्षी मान्सून दिल्लीत २८ जून रोजी पोहोचला होता.

या वर्षी मान्सून सन २००९नंतर प्रथमच वेळेच्या आधी केरळमध्ये दाखल झाला. २९ मेपर्यंत तो मध्य महाराष्ट्र आणि मुंबईसह संपूर्ण ईशान्येकडे पोहोचला. परंतु त्यानंतर २९ मे ते १६ जूनपर्यंत सुमारे १८ दिवस त्याची प्रगती धीमी राहिली. जूनच्या सुरुवातीला कोरडे हवामान असल्याने तापमान वाढले आणि ८-९ जूनच्या सुमारास वायव्य आणि मध्य भारतातील मोठ्या भागात उष्ण वारे वाहू लागले. त्यानंतर १६ ते १८ जूनदरम्यान पश्चिम बंगाल आणि गुजरातजवळील समुद्रात दोन नवीन कमी दाबाचे पट्टे तयार झाल्याने मान्सूनने पुन्हा वेग घेतला.

दिल्लीतमंगळवारीसंध्याकाळी विजेच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस आणि जोरदार वारे (ताशी ३०-४० किमी) वाहण्याचा अंदाज आहे. २६ जूनपर्यंत वायव्य भारत, मध्य प्रदेश, गुजरात, कोकण आणि गोव्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

# जिल्हा परिषद हायस्कूल, नवेगांव बांध येथे माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवेगांव/बांध : प्रतिनिधी

जिल्हा परिषद हायस्कूल, नवेगांव/बांध येथे शैक्षणिक वर्ष १९८५-८६ ला दहाव्या वर्गात शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलनस १५ जून २०२५ ला ग्रीन पार्क, राष्ट्रीय उद्यान, नवेगांव/बांध येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमात अध्यक्षीय मार्गदर्शन करताना जीवाला जीव लावून जीवशास्त्र शिकविणारे शिक्षक, माजी उप शिक्षणाधिकारी एस. एस. संग्रामे सर म्हणाले की, व्यसनाधीनतेपासून कुटुंबाला दूर ठेवा. धन संपत्ती पेक्षा मनाने श्रीमंत व्हा! दुःखाचे निवारण जेव्हाचे तेव्हा करा.

याप्रसंगी गणिताचे माजी शिक्षक के. आर. उके सर म्हणाले की, गणित हा सर्व विषयांचा राजा आहे. पी. टी. व भूगोलाचे माजी शिक्षक जी. जी. भेंडारकर म्हणाले की, शिक्षकच विद्यार्थ्यांत मिसळत नसतील तर विद्यार्थी शिक्षकांत कसे मिसळणार? करिता परस्परांशी समन्वय आवश्यक आहे. रसायनशास्त्राचे माजी शिक्षक एम. एम. रहिले सर म्हणाले की, निस्वार्थीपणे विद्यार्थी घडविण्यासाठी सेवानिवृत्ती पर्यंत कार्य केले आहे.

याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपात सुशिला हितेंद्र डोंगरे दाम्पत्य म्हणाले की, श्रीमंती आणि धनसंपत्ती ला कुणी विचारत नसतात तर मदत व सहकार्य हीच खरी श्रीमंती होय. बी. बी. मेश्राम म्हणाले की, के. आर. उके सरांनी गणित व भौतिक शास्त्र, एम. एम. रहिले सरांनी रसायनशास्त्र तर एस. एस. संग्रामे सरांनी जीवशास्त्राचा पाया मजबूत करून दिल्याने संबंधित ज्ञानाचा सदुपयोग करून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात सी. टी. स्कॅन तंत्रज्ञ पदावर कार्यरत असून ३ लाखांपेक्षा जास्त रुग्णांची तपासणी केली आहे. जी. जी. भेंडारकर सरांच्या भूगोलाच्या भौगोलिक ज्ञानाचा उपयोग करून देशातील विविध राज्यात भेट देऊन सामाजिक प्रबोधनाचे कार्य केले आहे. तसेच मराठी, इंग्रजी व हिंदी या भाषेसह इतिहास व नागरिकशास्त्राच्या ज्ञानाचा सदुपयोग करून लिखाण व व्याख्यानातून समाज प्रबोधनाचे कार्य निरंतरपणे सुरू आहे. प्रा. राजकुमार हातझाडे म्हणाले की, शालेय विद्यार्थ्यांना शिक्षकांनी शिक्षा केली तर तक्रार करू नये. शैलेश जायस्वाल यांनी 'मै भूल गया, तू रह गयी' ची आठवण करून दिली. छब्बू तिमांडे म्हणाल्या की, कार्यक्रमा निमित्त माहेराला यायची संधी मिळाली. प्रा. डॉ. मधुकर नंदनवार म्हणाले की, भंडारा जिल्ह्यातील दंडारी विषयावर संशोधन केले आहे.

या कार्यक्रमात कालकथित वर्ग मित्र, मैत्रिणी व शिक्षक वृंद यांना दोन मिनीटे स्तब्धता पाळून आदरांजली अर्पण करण्यात आली. निवृत्ती मोटघरे यांनी विसरू नको रे आई-बाबांना, झिझविली त्याने काया. हे सुमधूर गीत व दिवस हे मैत्रीचे पुन्हा येणार नाहीत ही कविता सादर करून सभागृहाची मने जिंकली. चिरंजीव वाघमारे यांनी ढवळ्या रं माझ्या पवळ्या रं हे गीत सादर केले. कार्यक्रमात चिंतामण वाघमारे पुरस्कृत पंचशील भीम गीत गायन मंडळांने स्वागत गीत सादर केले. आदर्शांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. तसेच ओ. आर. तुळशीकर, टिकाराम कापगते, प्रा. राजेश गायधनी, वंदना उजवने, देवांगना परशूरामकर, दिलीप कुथे, भोजराज वाडगुरे, राजेंद्र आगाशे, विजया दिवटे, रामू भेंडारकर यांनीही प्रातिनिधिक स्वरूपात आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. एस. एम. नरुले यांची विशेष उपस्थिती होती. तसेच प्रास्ताविक प्रा. डॉ. मधुकर नंदनवार, सुत्रसंचालन देवेंद्र नाकाडे, आभार प्रल्हाद कापगते यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला शेकडो माजी विद्यार्थी ३९ वर्षानंतर कुटुंबासह उपस्थित होते. अशाप्रकारे स्नेहसंमेलन हर्षोल्हासात संपन्न झाल्याचे प्रत्यक्षदर्शी माजी विद्यार्थी बी. बी. मेश्राम यांनी शब्दांकन केले आहे.